# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६
## (सकाळी ०९-४५ ते १०-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक - १)**

(१) **डॉ. अतुल भोसले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कराड (जि. सातारा) तालुक्यामधील दक्षिण मांड या छोट्या नदीचे पाणलोट क्षेत्र कमी असून नदी केवळ पावसाळ्यातच वाहत असल्याने पावसाळा संपल्यानंतर दरवर्षी या खो-यामध्ये शेतीच्या पाण्याची टंचाई जाणवत असणे, सुमारे २५ गावातील हजारो ग्रामस्थांना वाकुर्डे सिंचन योजनेच्या माध्यमातून शेतीसाठी व पिण्यासाठी पाणीपुरवठा केला जात असणे, दरवर्षी उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच या भागात पाण्याची समस्या निर्माण होणे, पाणी टंचाईमुळे हजारो शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच पाणी सोडण्याचे नियोजन होण्याची आवश्यकता, या योजनेतील ८० टक्के वीज खर्च शासनाकडून आणि २० टक्के खर्च शेतकऱ्यांकडून भरण्याची व्यवस्था करण्यात आली असली तरी हा २० टक्क्यांचा भारदेखील गरीब शेतकऱ्यांना पेलवत नसणे, जास्तीत जास्त सौर ऊर्जा निर्मिती करण्याचे शासनाचे धोरण असल्याने वाकुर्डे उपसा सिंचन योजनेच्या पंपांना देखील विद्युत पुरवठा करण्यासाठी सौरऊर्जा निर्मिती यंत्रणा उभारल्यास शेतक-यांवरील भार कमी होणार असल्याने यासाठी ही योजना सोलर फिडरवर आणण्याची आवश्यकता, तरी शासनाने पाणी सोडण्याचे योग्य नियोजन करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज असणे, तसेच सदर योजना सोलर फीडर वर चालविण्याकरिता शासनाने याबाबत तातडीने प्रस्ताव मागवून मंजुरी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री. प्रविण दटके, करण देवतळे, सुधीर मुनगंटीवार, मोहन मते, प्रताप अडसड, कृष्णा खोपडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर शहराचा आऊटर भागामधे म.न.पा. व ना.सु.प्र. च्या जागेवर मोबाईल टॉवर लावण्याची मोहीम सुरु असणे, अवैध मोबाईल टॉवर्सवर म.न.पा. व ना.सु.प्र. कारवाई करण्यास असमर्थ असणे, आयुक्त, महानगरपालिका यांना वारंवार दिलेली

तक्रार, मात्र मोबाईल कंपनीला छोटेखानी पत्र पाठवून दिशाभूल करून कसल्याही प्रकारची कारवाई न होणे, दूरसंचार कायदा दिनांक २६ जून, २०२४ रोजी लागू झालेला असून निगम आयुक्तांना दिनांक २ मे, २०२५ रोजी मंत्रालयाने पत्र पाठवून देखील यावर कारवाई न होणे, मोबाईल टॉवर कंपनीला अभयदान देण्याचा प्रयत्न, भरगच्छ वस्तीत अनधिकृत इमारतीवर असलेले मोबाईल टॉवर म्हणजे दुर्घटना होण्याची शक्यता, मोबाईल टॉवर उभारलेल्या इमारतीच्या बांधकामाला मंजुरी नसणे, इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट न होणे, मोबाईल कंपनीद्वारे त्यांच्या मर्जीने कुठेही मोबाईल टॉवर उभे करणे, राज्यात असे अनेक प्रकार घडले असून कसल्याही प्रकारची परवानगी न घेणे, त्यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या नियमांचे होत असलेले उल्लंघन, या अवैध मोबाईल टॉवर्समुळे निर्माण झालेला संभाव्य धोका टाळण्यासाठी व यावर नियंत्रण राखण्यासाठी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता, नागरिकांनी या अवैध मोबाईल टॉवर्स विरुद्ध म.न.पा. व ना.सु.प्र. मध्ये तक्रारी करून सुद्धा त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

**(३) डॉ. तुषार राठोड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सध्या बी. एच. एम. एस. (BHMS) पदवीधर डॉक्टरांना महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस (MUHS) अंतर्गत एक वर्षाचा सीसीएमपी हा ब्रिज कोर्स करून महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडे नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू असणे, त्यासाठी स्वतंत्र पोर्टल निर्माण करून संबंधितांना RMP चा दर्जा देण्याचा मार्ग खुला करण्यात येत असणे, ही केवळ सर्वसाधारण बाब नसून वैद्यकीय शिक्षणाच्या गुणवत्तेचा, कायदेशीर अधिकाराचा व रुग्णसेवेचा प्रश्न निर्माण करणारी असणे, एमबीबीएस अभ्यासक्रम हा साडेपाच वर्षाचा व्यापक, क्लीनिकल व सर्जिकल प्रशिक्षणावर आधारित अभ्यासक्रम असणे, मेडिसिन, सर्जरी, ICU, आपत्कालीन सेवा, स्त्रीरोग व प्रसूती सेवा, बालरोग इत्यादी गुंतागुंतीच्या आजारांच्या व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणे, याउलट CCMP हा एक वर्षाचा मर्यादित ब्रिज कोर्स असणे, राज्यात मोठ्या प्रमाणात MBBS डॉक्टर उपलब्ध असताना ब्रिज कोर्सच्या माध्यमातून समांतर मार्ग तयार केला जाणे, एक वर्षाचा ब्रिज कोर्स करून BHMS डॉक्टर्सना full fledged ऍलोपॅथी प्रॅक्टिस करण्याचा मार्ग खुला होणे व यामुळे सर्वसामान्य जनतेचे आरोग्य धोक्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) श्री. विजय शिवतारे, ॲड. राहूल कुल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहरातील हिंजवडी हे आयटी हब म्हणून उदयास येणे, प्रचंड ट्रॅफिक आणि पाच पाच तास होणारी वाहतूक कोंडी यामुळे उद्योजक हैराण होणे, अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि इतर समस्यांमुळे बार्कले, नाईस, क्रेडिट स्विस, ल्युमीडेक्स यांसारख्या अनेक बड्या आयटी कंपन्यांनी हिंजवडी मधून परराज्यात स्थलांतर करणे, परिस्थितीत सुधारणा नसल्याने आणखी कंपन्या इतरत्र स्थलांतरित होण्याच्या विचारात असणे, स्थलांतरण रोखण्यासाठी व रोजगारवृद्धीसाठी पुण्याच्या बाजूला पुरंदर तालुक्यातील

मौजे दिवे, मौजे कोडीत व चांबळी येथे आयटी पार्क प्रस्तावित करणे, प्रस्तावित जमिनी शासकीय गायरान असल्याने संपादनाची समस्या व खर्च नसणे, दिनांक २४ जुलै, २०२४ रोजी तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी तसेच दिनांक ३ एप्रिल, २०२५ रोजी मा. उद्योगमंत्री यांनी बैठका घेऊन महसूल विभागाकडून हस्तांतरण प्रस्ताव सादर करावा असे निदेश दिलेले असणे, मात्र अद्याप याबाबत महसूल विभागाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, सदरहू विषय तातडीने मार्गी लावण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(५) श्री. तानाजी मुटकुळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विद्या शक्ती शिक्षण प्रसारक मंडळ, कोळसा, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली द्वारा संचालित काही लखन सर्जेराव नाईक इंग्लिश स्कूल, कोळसा या शाळेत मराठीची मान्यता असताना मुद्दामहून खाडाखोड करुन इंग्रजी माध्यम सुरु करणे, त्यातून करोडो रुपये मिळविले असणे, राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे, या शाळेची मान्यता घेताना मागील तीन वर्षाचे दहावीचे निकाल संस्थेतील दुसऱ्या मराठी माध्यमिक शाळेचे दाखविलेले असणे, सन २०२४-२५ मध्ये सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, हिंगोली यांनी दिनांक ६ मार्च, २०२५ रोजी भेट दिली असता दोनशे विद्यार्थ्यांपैकी १८३ विद्यार्थी उपस्थित व १७ विद्यार्थी रजा घेऊन गावी गेल्याचा अहवाल देण्यात येणे, सन २०२४-२५ मध्ये ३०० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्कापोटी शासनाकडून या संस्थेला देण्यात आलेले असणे, सदर शाळेची सखोल चौकशी करून शाळेच्या सद्य:स्थितीचा अहवाल शासनास सादर करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(६) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अकोले विधानसभा क्षेत्रातील साठवण तलाव मोरदरी, समशेरपूर ता.अकोले, जि.अहिल्यानगर या योजनेस जिल्हा वार्षिक आदिवासी उपाययोजना सन २०१४-१५ (लघु पाटबंधारे योजना १०१ ते २५० हेक्टर) जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समिती, अहिल्यानगर यांजकडून रुपये ४६७.३२ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त असणे, सदर कामाचे पाया खोदाई करत असतांना पायामध्ये कार (Dyke) लागल्यामुळे त्यामधून गळती होण्याची शक्यता असणे, गळती रोखण्यासाठी Dyke वरील उपाययोजना करणे आवश्यक असणे, सदरहू उपाययोजना करण्यासाठी खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली असणे, सदरील Dyke वरील उपाययोजनेसाठी येणारा खर्च तसेच GST व Royalty च्या रकमेत झालेली वाढ,या सर्व बाबींमुळे योजनेच्या खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली असणे, सदर योजना पूर्ण झाल्यास आदिवासी भागातील १२५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून तेथील सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार असणे, सदरील साठवण तलावाचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २६२४.२७ लक्ष जिल्हाधिकारी

कार्यालयाकडून विभागाकडे सादर करण्यात आलेला असणे, सदर कामास तातडीने आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता असणे, आदिवासी विभागामार्फत काही मतदार संघात जलसंधारणाच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येणे परंतु मोरदरी साठवण बंधाऱ्यास आदिवासी विभागाकडे अद्यापही जाणीवपूर्वक प्रस्ताव प्रलंबित असणे, त्यामुळे जनमानसात तीव्र नाराजी निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(७) सर्वश्री. नाना पटोले, समाधान अवताडे, विजय देशमुख, संजय केळकर, विलास तरे, विजय वडेट्टीवार, अमोल जावळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये महसूल, परिवहन व पोलीस विभागांतर्गत कार्यरत असलेल्या चेकपोस्टवर वाहनचालक, मालवाहतूकदार व सर्वसामान्य नागरिकांकडून गंभीर तक्रारी प्राप्त होत असणे, अनेक ठिकाणी अनावश्यक वाहन तपासणी, कागदपत्रांच्या किरकोळ कारणांवरून अडवणूक, विलंब तसेच कथित आर्थिक वसुली होत असल्याच्या तक्रारी मोठया प्रमाणात वाढल्या असणे, यामुळे मालवाहतुकीला उशीर होऊन उद्योग-व्यवसायांवर आर्थिक परिणाम होत असणे,काही चेकपोस्टवर सीसीटीव्ही व्यवस्था अपुरी असून डिजिटल पावती प्रणालीचा अभाव दिसून येणे,परिणामी पारदर्शकतेबाबत प्रश्न निर्माण होणे, राज्य शासनाने सर्व चेकपोस्टवर ई-तपासणी प्रणाली, सीसीटीव्ही अनिवार्य करणे, तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे व दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक असणे, तसेच राज्यातील सर्व चेकपोस्टची सखोल चौकशी करून पारदर्शक व नागरिकाभिमुख व्यवस्था उभारण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(८) श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नांदेड जिल्हयातील लोह तालुक्यातील जय मल्हार मच्छिमार संस्था, गवंडगाव, मल्हारी मार्तंड भुजलाशयीन मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्या. आंडगा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भुजलाशयीन मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्या. माळेगांव व राजमाता अहिल्यादेवी भुजलाशयीन मत्स्य व्यवसायिक सहकारी घोटका, या चारही संस्था एकाच व्यक्तीने (श्री.चंद्रसेन ईश्वरराव पाटील, रा.गवंडगाव, ता.लोहा) नोंदणी केल्या असल्याचे आढळून येणे, तथापि यापैकी एकाही संस्थेत क्रियाशील सभासद नसल्याचे आढळून आलेले असणे, परिणामी जिल्हयातील मूळ मच्छिमारी करणाऱ्या व्यक्तींवर आलेली उपासमारीची वेळ, त्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेली नैराश्याची भावना, सदर बनावट व खोटया कागदपत्रांच्या आधारे नोंदणी केलेल्या बनावट संस्थेमार्फत मच्छिमार असल्याचे तसेच शासनाकडून लाखो रुपयांची मच्छिमारी केल्याचे दाखवून शासनाचे लाखो रुपये उकळण्यात आल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे अन्य गरजू व्यक्तींना मच्छिमारी करण्यापासून वंचित ठेवण्यात येणे, परिणामी त्या भागातील व परिसरातील क्रियाशील मच्छिमारांनी याबाबत शासनाकडून चौकशी करुन संबंधित व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाकडे मागणी करण्यात आलेली असणे, शासनाचा निधी गैरमार्गाने हडप करणाऱ्या व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करुन

कारवाई करण्याची आवश्यकता व  अपहार केलेल्या रकमेची वसुली करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(९) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्याच्या दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्यसेवा पुरविण्यासाठी बांधलेले इसापूर येथील आरोग्यवर्धिनी केंद्र गेल्या १५ वर्षापासून कर्मचारी आणि सुविधांअभावी बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, लाखो रुपये खर्चून उभारलेली इमारत केवळ ओसाड वास्तू म्हणून असणे, या आरोग्य केंद्रावर सहा गावातील हजारो नागरिकांचे आरोग्य अवलंबून असणे, सद्य:स्थितीत या आरोग्य केंद्राची अवस्था अत्यंत दयनीय झालेली असणे, इमारतीच्या भोवती घाणीचे साम्राज्य पसरलेले असून आजुबाजुला झाडे-झुडपे वाढलेली असणे, इमारत अवैध धंदयाचे केंद्र बनलेले असणे, केंद्राला परिचारिका, कर्मचारी, रुग्णवाहिका मिळण्याबाबत एकमुखी मागणी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी संबंधिताकडे करणे, असे असतानाही अदयाप याबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, सहा दुर्गम गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून यास जबाबदार असणा-यांवर कारवाई करण्यासह आरोग्य केंद्र सुसज्ज करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सकाळी ११-०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (तिसरा दिवस)**

(१) नगरविकास विभाग

(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(३) गृहनिर्माण विभाग

(४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

(५) इतर मागास बहुजन कल्याण विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) श्री. अभिजीत पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशय, जलपर्यटन, धार्मिक, निसर्ग पर्यटन, कृषी पर्यटन, विनयाई पर्यटन विकासाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याचा रु.३४२.७५ कोटी खर्चाचा प्रस्ताव मा.पालकमंत्री, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या मान्यतेस्तव सादर केलेला असणे, उक्त प्रस्तावावर उच्चाधिकार समितीच्या दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या बैठकीत सदर प्रस्तावातील पाण्याखालील प्राचीन शहर रु.५० कोटी तसेच मार्केटींग, ब्रँडींग व क्षमता बांधणी रु.१० कोटी असे एकूण रु.६० कोटी किंमतीचे काम वगळून उर्वरित रु.२८२.७५ कोटी इतक्या किंमतीचा आराखडा मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील शिखर समिती समोर मान्यतेस्तव ठेवण्याची शिफारस करण्यात येणे, तद्नंतर दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी सदर प्रस्तावित रु.२८२.७५ कोटी किंमतीच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, कामांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करून घेण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना "संनियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येणे, उक्त आराखड्यास प्रशासकीय मान्यता मिळून ८ ते ९ महिने उलटूनही अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नसणे, शासनाने पर्यटन धोरणानुसार उजनी धरणावरती पर्यटन क्षेत्र निर्माण करून त्या ठिकाणी रोजगार निर्मिती करण्यास प्राधान्य देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) सर्वश्री. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. समीर कुणावार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"पनवेल (जि.रायगड) तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस होऊनसुध्दा व सर्व धरणे भरली असून देखील पनवेल विधानसभा अंतर्गत येणा-या खारघर, कामोठे, नवीन पनवेल, तळोजा अशा ठिकाणी लोकांना तीव्र पाणी टंचाई जाणवत असणे, सातत्याने होत असलेल्या अपु-या पाणी पुरवठ्याबाबत वारंवार लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी प्रशासनाचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले असणे, परंतू सिडको प्रशासन विशेषतः पाणी पुरवठा विभागाशी संबंधित अधिकारी याबाबत गंभीर असल्याचे दिसत नसणे, सणवार जवळ आले की पाणी पुरवठा अत्यंत अनियमित होत असणे, वारंवार सिडको प्रशासनाला याबाबत विविध सूचना केल्या असतानाही सिडकोतर्फे कुठल्याही प्रकारची अंमलबजावणी होताना दिसत नसणे, सिडको पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी अत्यंत बेफीकीर वृत्तीने काम करत असून कुठल्याही प्रकारचे उत्तरदायित्व स्विकारताना दिसत नसणे, काही विभागात हेतूपुरस्सर पाणी टंचाई निर्माण केली जाते असल्याचा आरोपही नागरिकांनी केला असणे, पाणी टंचाई अभावी पाण्याचे टँकर देताना हे अधिकारी

अत्यंत मनमानी पध्दतीने त्याचे वाटप करत असणे, त्यामुळे नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता असणे, जो पर्यंत उक्त विभागात नियमित पाणी पुरवठा होत नाही तोपर्यंत कुठल्याही प्रकारच्या नवीन बांधकामांना भोगवटा प्रमाणपत्र व पूर्णत्वाचा दाखला देण्यात येऊ नये, यावर शासनाने मनमानी कारभार करणाऱ्या उक्त विभागातील कर्मचा-यांवर कारवाई करून पाणी पुरवठा नियमित होणेकरिता उपाययोजना करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(३) श्री. मनोज जामसुतकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील म्हाडाच्या पुनर्रचित ३८८ इमारतींच्या पुनर्विकासाच्या संदर्भात शासनाने माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार, ३३(७) चे सर्व फायदे ३३(२४) मध्ये समाविष्ट करून पुनर्विकासाचा मार्ग मोकळा केलेला असणे, तथापि सदर नियमांतर्गत अद्याप एकाही इमारतीचा पुनर्विकास प्रकल्प सादर झालेला नसणे, ३८८ इमारतींचे भूखंड लहान असून रहिवाशांची संख्या जास्त असल्यामुळे विकासकांसाठी प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरत नसणे, म्हाडा स्वतः इमारतींची मालक असताना, खासगी विकासकांकडून २०% प्रीमियमची मागणी करणे, तसेच, लँड कॉस्टच्या २५% रेडीरेकनर दराएवढे फ्लॅट्स म्हाडाला देण्याची अट घालण्यात येणे, त्यामुळे कोणताही विकासक पुढे येण्यास तयार नसणे, इमारतींचा सुरुवातीचा एफएसआय ३.१९ वापरला असल्याने विकासकाला अतिरिक्त एफएसआय मिळणार नसणे, क्लस्टर डेव्हलपमेंटमध्ये शेजारील सेस इमारतींचे मालक आणि भाडेकरू सहकार्य करीत नसणे, पुनर्विकासासाठी आवश्यक असणारे प्रॉपर्टीकार्ड, इमारतीचे नकाशे म्हाडाकडून वेळेत उपलब्ध न होणे, तसेच म्हाडाकडून अद्यापही होकार पत्राचा आणि डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट (DA) चा मसुदा तयार झालेला नसून जुनाच ३३(७) चा फॉरमॅट वापरला जाणे, म्हाडा स्वतः मालक असतानाही, एसआरए किंवा सेस इमारतींप्रमाणेच भाडेपावत्या आणि इतर अनावश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात येणे, तसेच सक्सेशनची जाचक अट घालण्यात येणे, म्हाडाच्या ३८८ इमारतींच्या पुनर्विकासात येणा-या अडचणी सोडवून या इमरतींच्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. सुहास कांदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक येथील सर्वे नं.७५९/ए/२, ७५९/ए/३ व ७५९/ए/४ यांचे एकूण क्षेत्र १६०००.०० चौ. मीटर या मिळकतीचे मालक व भागिदार यांनी नाशिक महापालिकेकडून दिनांक ५ नोव्हेंबर, २०१९ रोजी एम.एन.डी./बी.पी./सी.डी. ७३१ अन्वये बांधकाम नकाशा मंजूर करुन घेतलेला असणे, सदर मिळकतीवर नाशिक शहरात सेंट्रल पार्क अपार्टमेंट या नावाने एकूण १० इमारतींचे बांधकाम करण्यात येणे, सदरचा गृहनिर्माण प्रकल्प हा रेरा कायद्यान्वये दिनांक २ जानेवारी, २०२०

रोजी नोंदणीकृत असणे, सदर प्रकल्पाचा बांधकाम नकाश मंजूर करतेवेळी तो प्रधानमंत्री आवास योजना अर्बनच्या नियमानुसार नाशिक महानगरपालिकेकडून नोंदणीकृत करण्यात आलेला नसणे, प्रधानमंत्री आवास योजना अर्बन योजनेंतर्गत तयार करण्यात आलेली घरे ई.डब्ल्य.एस./एल.आय.जी. (ईकोमॉमिकल व्हिकर) ई.डब्ल्य.एस. सेक्शन व अल्प उत्पन्न गटातील नागरीकांसाठी माफक दरात घरे मिळावीत यासाठी असणे, सदर गृहनिर्माण प्रकल्पाचा बांधकाम नकाशा मंजूर करतेवेळी या इमारती प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत येत असल्याची बाब लपवून ठेवण्यात येणे, कागदपत्रांची फेरफार करण्यात येणे, गोरगरीबांना माफक दरात घरे विकण्याची परवानगी असतांना आर्थिकदृष्ट्या श्रीमंत लोकांना प्रकल्पातील घरे विकल्याची बाब निदर्शनास येणे, सदरच्या प्रकल्पामधील एफ विंग मधील प्लॉट नं.१३०१ ही मिळकत इन्होवा रबर्स प्रा.लि. कंपनीला दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी (दस्त क्र.२७३३/२०२३) विक्री करण्यात आल्याचे निदर्शनास येणे,संबंधित विकासकाविरुध्द गंगापूर, जि.नाशिक पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १७ फेब्रुवारी, २०२५ रोजी फसवणूकीची तक्रार करण्यात येणे, शासनाने उक्त प्रकरणाची पारदर्शक चौकशी करुन दोषी विकासकावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) ॲड. राहूल कुल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जलसिंचनामुळे राज्यातील चिबड जमिनींचे प्रमाण वाढले असल्याने चिबड जमिनी निर्मुलनाची आवश्यकता असणे, पाझरचर, बंदिस्त पझारचर यासाठी मापदंड निश्चित करून पाझरचर निर्मुलनासाठी दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे अंदाजपत्रके त्वरित तयार करून त्यास मान्यता देण्याची आवश्यकता, नदी क्षेत्रातील उक्त जमिन सुधारणेकरीता १००% रक्कम अनुदान देण्याची मागणी, खडकवासला फुरसुंगी बोगदा प्रकल्पाचे काम सुरु असून उक्त काम वेळेत पूर्ण होण्याची आवश्यकता असणे, जनाई शिरसाई उपसासिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण निधीस मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून निविदा प्रक्रिया सुरु असणे, पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या कुपटेवाडी (भुलेश्वर) येथील वितरिकेच्या वरील बाजूस, वंचित जिरायती भागातील गावांच्या सिंचनासाठी नवीन पाईपलाईनसाठी अंदाजपत्रके तयार करण्यात येणे, त्यास पाणी परवानगी दिली असून, निधीसह मान्यता मिळण्याची आवश्यकता असणे, दौंडच्या पूर्वभागातील अनेक गावांतील शेती उजनी धरणाच्या बॅकवॉटरवर अवलंबून असणे, त्याठिकाणी बॅरेजे बांधण्याची मागणी असणे, मुळा मुठा व भीमानदीवर कोपबंधाऱ्यांना अनेक वर्षांचा कालावधी झाला असल्याने त्यामधून पाण्याची गळती होत असल्याने, बंधाऱ्यांचे स्वयंचलित बॅरेजेसमध्ये रुपांतर करण्याची आवश्यकता असणे, मुळशीचे पाणी पूर्वमुखी वळविण्याच्या प्रस्तावास टाटा पॉवर यांच्याकडून तत्वतः मान्यता दिली असणे, उक्त सर्व विषयांबाबत मा. मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री यांचेकडे दिनांक

१२.०२.२०२५, १३.०८.२०२५, ३०.०९.२०२५, ०४.०३.२०२६ रोजी बैठका घेऊन देखील कोणताही निर्णय झाला नसणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(६) श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"इगतपुरी-त्र्यंबकेश्वर मतदार संघात इगतपुरी तालुक्यात अनेक महत्वपूर्ण व मोठमोठया औद्योगिक वसाहती असून सदरच्या कंपन्यांमध्ये दररोज कोटयवधी रुपयांचे स्क्रॅप मटेरियल निघणे, परंतु सदर स्क्रॅप मटेरियलचे ऑडिट होत नसल्याने शासनाचा कोटयवधींचा महसूल बुडणे, या स्क्रॅप मटेरियलकरिता निविदा काढणे आवश्यक असतानाही निविदा न काढता हे स्क्रॅप मटेरियल विकण्यात येत असणे, यासंदर्भात शासनाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रार करणे तसेच दिनांक २७ जानेवारी, २०२६ रोजीच्या सुमारास मा.उद्योग मंत्री यांना लेखी निवेदनही देण्यात येणे, परंतु अद्यापही यावर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, शासनाचा कोटयवधींचा महसूल बुडत असल्याने या स्क्रॅप मटेरियलकरिता निविदा काढण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(७) श्री. रविशेठ पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"रायगड जिल्हयातील सुधागड (पाली) तालुक्यातील इको सेन्सिटिव्ह झोन मधून सुधागड (पाली) तालुक्यातील ५२ महसुली गावे वगळण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधींकडून केली जात असल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, सदरची ५२ महसुली गावे इको सेन्सिटिव्ह झोन मधुन वगळली जात नसल्याने मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ मुंबई व ठाणे या शहरात स्थलांतरित होत असणे, सदरची ५२ महसुली गावे इको सेन्सिटिव्ह झोन मधून वगळणेबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(८) श्री. किसन वानखेडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"उमरखेड विधानसभा मतदारसंघातील एमएसआयडीसी (MSIDC) अंतर्गत ५१C व ५१ D ही कामे HAM योजनेअंतर्गत प्रस्तावित असून सदर रस्ता अत्यंत महत्त्वाचा असणे, या रस्त्यावर उमरखेड येथील साखर कारखाना, शहरातील शाळा व महाविद्यालये, MIDC क्षेत्र तसेच सहस्त्रकुंड धबधबा ही पर्यटन स्थळे असणे, सदरहू रस्ता राष्ट्रीय महामार्गास जोडला जात असल्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असणे, तथापि सदर कामांच्या अंदाजपत्रकात रस्त्याची रुंदी केवळ ७ मीटर प्रस्तावित करण्यात आली असून वाढत्या वाहतुकीचा विचार करता

ही रुंदी अपुरी असणे, तसेच प्रत्येक गावामध्ये रस्ता रुंदीकरण व काँक्रीट नालीची आवश्यकता असतानाही त्याबाबत कोणतीही तरतूद करण्यात आलेली नसणे, ही बाब अत्यंत गंभीर व चिंताजनक असणे, सदर दोन्ही कामांमध्ये रस्त्याची रुंदी किमान १० मीटर करण्यात यावी, गावालगतच्या रस्त्यांचे चौपदरीकरण करण्यात यावे, तसेच आवश्यकतेनुसार दोन्ही बाजूंनी काँक्रीट नालीची तरतूद करण्यात यावी तसेच उमरखेड शहरातील उड्डाणपुलापासून गोपिकाबाई गवंडे महाविद्यालयापर्यंत रस्त्याचे चौपदरीकरण व दोन्ही बाजूंनी काँक्रीट नाली बांधकाम करण्याबाबत संबंधित यंत्रणेस तात्काळ आदेश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

**(९) डॉ. नितिन राऊत, श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर येथे शासनाने १४० कोटी रुपये खर्चून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर उभारले असणे, मात्र माहे फेब्रुवारी, २०२६ च्या पाहणीनुसार इतका प्रचंड निधी खर्च करूनही ही वास्तू केवळ 'शोभेची वस्तू' म्हणून असणे, येथे नियोजित असलेला ४० फूट उंचीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा अद्याप उभारला गेलेला नसणे, सदरहू बाब अत्यंत खेदजनक असणे,सध्या येथे केवळ सभागृह आणि वाचनालय सुरू असणे, नियोजित बँक, उपहारगृह आणि व्यावसायिक गाळे प्रशासकीय उदासीनतेमुळे बंद असणे, यासंदर्भात सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त व संबंधित अधिकारी कमालीचे दुर्लक्ष करीत असणे, विचारणा केल्यास योग्यप्रकारे उत्तरे दिली जात नसणे, धक्कादायक बाब म्हणजे केंद्राच्या देखभालीसाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र निधीची तरतूदही करण्यात आलेली नसणे, सार्वजनिक निधीचा असा अपव्यय आणि महापुरुषांच्या स्मारकाची ही उपेक्षा जनतेमध्ये तीव्र संताप निर्माण करत असणे, या केंद्रातील सर्व सुविधा तात्काळ सुरू करण्याबाबत, निधीची उपलब्धता करून देण्याबाबत आणि दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**चार : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री. हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, नितीन राऊत, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री. रामदास मसराम, हेमंत ओगले व अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३) (क) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र निरसन विधेयक, २०२६**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र निरसन विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री. हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र निरसन विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**पाच : (गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, मनोज कायंदे, प्रशांत बंब, दिपक केसरकर, चेतन तुपे, सुरेश धस, तानाजी सावंत, शेखर निकम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रमेश बोरनारे, प्रताप पाटील-चिखलीकर, चैनसुख संचेती, राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रकाश भारसाकळे, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. उमेश यावलकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, बबनराव लोणीकर, विलास तरे, सुनिल शेळके, संभाजी निलंगेकर-पाटील, अतुल भातखळकर, संजय उपाध्याय, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. चंद्रदिप नरके, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री मंगेश चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके, मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, गोपीचंद पडळकर, किशोर पाटील, राजकुमार बडोले, सुरेश भोळे, शांताराम मोरे, नारायण कुचे, प्रकाश सुर्वे, हरिष पिंपळे, निलेश राणे, राजू तोडसाम, तुकाराम काते, अभिमन्यू पवार, अशोक पाटील, देवराव भोंगळे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, योगेश सागर, समीर कुणावार, सुहास कांदे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री संजय गायकवाड, सत्यजित देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेंद्र थोरवे, सुमित वानखेडे, महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री संतोष बांगर,**

**सुनिल कांबळे, राजेश बकाने, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री दिलीप लांडे, किशोर जोरगेवार, महेश शिंदे, राजेश पवार, आमश्या पाडवी, संतोष दानवे, हिकमत उढाण, राम कदम, संजय केळकर, मिहिर कोटेचा, केवलराम काळे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, राणाजगजितसिंह पाटील, अमोल खताळ, ॲड. राहुल कुल, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, समाधान आवताडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सुहास बाबर, राजेश पाडवी, विलास भुमरे, काशिराम पावरा, राजेश मोरे, दिलीप बोरसे, विठ्ठल लंघे, प्रताप अडसड, किरण सामंत, श्रीमती सई डहाके, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री मोहन मते, राजेंद्र यड्रावकर-पाटील, कृष्णा खोपडे, शरद सोनवणे, विनोद अग्रवाल, शिवाजी पाटील, जितेश अंतापुरकर, किर्तीकुमार भांगडीया, सर्वश्रीमती अनुराधा चव्हाण, नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, संजय पुराम, विजय रहांगडाले, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, करण देवतळे, भीमराव केराम, तुषार राठोड, तानाजी मुटकुळे, अनुपभैय्या अग्रवाल, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री श्याम खोडे, प्रविण तायडे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, देवेंद्र कोठे, विजय देशमुख, हेमंत रासने, भिमराव तापकीर, अमल महाडिक, सुरेश खाडे, राहुल आवाडे, मनोज घोरपडे, सुधीर गाडगीळ, महेश लांडगे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी '**AI for Agri २०२६**' ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्य प्राण्यांच्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**सहा : (गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, संदिप क्षिरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"माहे जानेवारी, २०२५ आणि जानेवारी, २०२६ मध्ये दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० लाख कोटी आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उद्योग राज्यात उभारला न जाणे, राज्यातील टाटा एअरबस, वेदांता फॉक्सकॉन, सॅफ्रेन, बल्कड्रग पार्क, पाणबुडी इत्यादी अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा, परिणामी राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद असणे, राज्यात विविध योजनांचा निधी रखडलेला असून त्यामुळे राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व लाभार्थी यांच्यावर त्याचा थेट परिणाम होत असणे, नियोजन विभागांतर्गत विविध योजनांचा निधी रखडल्याने कंत्राटदार व कामगार यांच्यावर आर्थिक ताण निर्माण होत असणे, परिणामी राज्यातील विकास कामांचा वेग मंदावलेला असणे, राज्यातील विकास योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, राज्यातील नगरपालिका महानगरपालिकेचा कारभार मागील अनेक वर्षापासून प्रशासकाच्या मार्फत चालू असल्याने प्रशासनावर नसलेला वचक त्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार आणि नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विविध मेट्रो प्रकल्पांत झालेल्या आणि होत असलेल्या निकृष्ट बांधकामामुळे होत असलेले अपघात, MMRDA, CIDCO यासारख्या महामंडळाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती, विविध शहरांचे रखडलेले हद्दवाढीचे प्रस्ताव, विकास आराखड्याचे प्रस्ताव यामुळे कुंठित झालेला शहरांचा विकास, अमृत योजनेंतर्गत निधी नसल्यामुळे रखडलेले पाणीपुरवठा व इतर विकास कामांचे प्रकल्प, पुणे विमानतळा शेजारुन जाणारा रस्ता भविष्यात बंद होण्याची शक्यता असल्याने ५०९ चौक ते कलवड मार्गे धानोरी-लोहगाव रस्त्याला जोडणारा कलम २०५ अंतर्गतचा रस्ता प्रलंबित असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : (गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री. सुनिल प्रभू, रोहित पवार, अमीन**

**पटेल, दिलीप सोपल, संदिप क्षिरसागर, अस्लम शेख, अजय चौधरी, बापूसाहेब पठारे, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, श्री रोहित पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, उत्तमराव जानकर, अमित झनक, सुनिल राऊत, नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, रामदास मसराम, महेश सावंत, अनिल मांगुळकर, प्रविण स्वामी, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात २०२६ पासून 'मोफत उपचार' सेवा बंद होऊन केसपेपर व शस्त्रक्रियांसाठी शुल्क आकारणी सुरू झाल्याने गरीब रुग्णांचे हाल होत असणे, त्यातच औषधांचा, विशेषतः प्रतिजैविके आणि मनोरुग्णांच्या गोळ्यांचा १.५ वर्षांपासून असलेला तुटवडा चिंतेचा विषय असणे, १,४०० हून अधिक डॉक्टरांची रिक्त पदे आणि भूलतज्ज्ञांच्या अभावामुळे ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना शेजारील राज्यांत उपचारार्थ जावे लागत असणे, अनेक ग्रामीण रुग्णालयांची गळकी छते, अस्वच्छता आणि फायर एनओसीचा अभाव यामुळे रुग्णांची सुरक्षा धोक्यात आली असणे, राज्यातील औषधी पुरवठ्यामध्ये होत असलेली अनियमितता, प्राथमिक आरोग्यकेंद्र, उपकेंद्र यांची झालेली बिकट परिस्थिती, काही ठराविक औषधांसाठी खरेदी होणे, १०८ वरील रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध न होणे, पुण्यातील बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय (ससून रुग्णालय), नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि मुंबईतील ग्रँट मेडीकल कॉलेज (जे.जे.रुग्णालय) या तीन शासकीय महाविद्यालयांना स्वायत्ततेचा दर्जा देण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ०८ ऑगस्ट, २०२५ रोजी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांना दिलेल्या सूचना, यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने अद्यापपर्यंत समितीची स्थापना न करणे, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये शासनाच्या अखत्यारीत असून विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेणे व पदवी देण्याची जबाबदारी महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ (नाशिक) यांच्याकडे असणे, स्वायतत्ता दिल्यास दोन्ही बाबी एकाच यंत्रणेकडे राहणार असणे, फलटण (जि.सातारा) येथील शासकीय रुग्णालयातील एका महिला डॉक्टरनी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये हॉटेलमध्ये गळफास घेऊन केलेली आत्महत्या, आत्महत्या करण्यापूर्वी महिला डॉक्टरांनी दोन आरोपींची उघड केलेली नावे, यासंदर्भात एसआयटी आणि न्यायिक चौकशी करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, दोन्ही चौकशी त्वरीत पूर्ण करुन आरोपीस कडक शिक्षा देण्याची आवश्यकता, राज्यात विशेषत: ग्रामीण भागातील महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने करावयाची उपाययोजना,तसेच राज्यातील रस्त्यांची स्थितीही दयनीय असणे, ग्रामीण भागातील रस्त्यांची निधी अभावी झालेली दुरवस्था, शहरी भागात काँक्रीटीकरणाच्या कामांमुळे वाहतूक कोंडी वाढली असून घोडबंदर रस्ता अपघातांचा सापळा बनला असणे, निकृष्ट डांबरीकरण, अवजड वाहतूक आणि विविध विभागांमधील समन्वयाअभावी नवीन रस्तेही लवकर खराब होत असणे, यामुळे नागरिकांना मणक्याचे आजार जडत असून इंधन आणि वाहनांच्या दुरुस्तीवर मोठा खर्च होत असणे, मुंबई - पुणे एक्सप्रेसवेवर ३० तास वाहतूक ठप्प होणे व अन्न-पाण्याविना नागरिकांचे

अतोनात हाल होणे, राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने अध्यापन कार्यावर परिणाम होत असणे, शासनाने कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरती पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेणे, याला शिक्षक संघटना व विविध संघटनांकडून तीव्र विरोध होत असणे, कंत्राटी भरतीमुळे शिक्षकांना नोकरीची हमी, वेतनातील समता व सेवा स्थैर्य मिळत नसणे, त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नसणे, गुणवत्ता पुर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी कंत्राटी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्याऐवजी कायमस्वरुपी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

आठ : **(गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अमित साटम, रमेश बोरनारे, चेतन तुपे, योगेश सागर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, राजकुमार बडोले, प्रविण दटके, दिपक केसरकर, शेखर निकम, अतुल भातखळकर, डॉ. तानाजी सावंत, सर्वश्री प्रतापराव पाटील-चिखलीकर, संभाजी पाटील-निलंगेकर, राजेंद्र गावित, संजय बनसोडे, सुधीर मुनगंटीवार, विजय शिवतारे, राजेश विटेकर, मिहीर कोटेचा, राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. संजय उपाध्याय, डॉ. बालाजी किणीकर, श्रीमती सना मलिक, सर्वश्री मोहन मते, विलास तरे, शंकर मांडेकर, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री चंद्रदीप नरके, प्रकाश सोळंके, प्रकाश सुर्वे, अतुलबाबा भोसले, नरेंद्र भोंडेकर, प्रशांत ठाकूर, मंगेश कुडाळकर, अभिमन्यु पवार, किशोर पाटील, रविंद्र चव्हाण, रविशेठ पाटील, निलेश राणे, संजय केळकर, तुकाराम काते, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अशोक पाटील, कृष्णा खोपडे, शरददादा सोनावणे, महेश बालदी, बालाजी कल्याणकर, महेश लांडगे, सुहास कांदे, शंकर जगताप, श्रीमती मंजुळा गावित, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री महेंद्र थोरवे, करण देवतळे, महेंद्र दळवी, पराग शाह, चंद्रकांत पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री संतोष बांगर, बबनराव लोणीकर, विश्वनाथ भोईर, प्रशांत बंब, राम कदम, दिलीप लांडे, कालिदास कोळंबकर, महेश शिंदे, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री आमश्या पाडवी, अनुपभैय्या अग्रवाल, हिकमत उढाण, विक्रम पाचपुते, बाबुराव कदम-कोहळीकर, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री अमोल खताळ, सुरेश भोळे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, राहूल कुल, मुरजी पटेल, देवेंद्र कोठे, अमोल पाटील, सत्यजित देशमुख, सुहास बाबर, समीर कुणावार, राजेश मोरे, देवराव भोंगळे, विठ्ठल लंघे, डॉ. राहूल आहेर, सर्वश्री किरण सामंत, नारायण कुचे, शिवाजी पाटील, प्रताप अडसड, मंगेश चव्हाण, डॉ. अशोकराव माने, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सुनिल कांबळे, अमल महाडिक, सचिन कल्याण-शेट्टी, प्रकाश भारसाकळे, चरणसिंग ठाकूर, बंटी भांगडिया, राजेश पवार, श्रीमती अनुराधा चव्हाण, श्री. विनोद अग्रवाल, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री किसन कथोरे, राजन नाईक, सर्वश्रीमती विद्या ठाकूर, श्वेता महाले, श्री. सुरेश धस, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री राघवेंद्र पाटील,**

**सुभाष देशमुख, समाधान आवताडे, मनोज घोरपडे, चैनसुख संचेती, डॉ. संजय कुटे, सर्वश्री राजु तोडसाम, प्रविण तायडे, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री राजेश बकाने, तानाजी मुटकुळे, जितेश अंतापुरकर, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. नरेंद्र मेहता, सर्वश्रीमती स्नेहा दुबे, सुलभा गायकवाड, सर्वश्री हरिश्चंद्र भोये, राजेश पाडवी, दिलीप बोरसे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वात ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे झालेले करार व दिवंगत उपमुख्यमंत्री तथा तत्कालीन अर्थमंत्री यांचे आर्थिक नियोजन व योगदान, मा.उपमुख्यमंत्री तथा नगरविकास व गृहनिर्माण मंत्री यांची दूरदृष्टी यामुळे महाराष्ट्र 'गुंतवणूकीचे पावर हाऊस' झाले असणे, यापैकी ८३ टक्के करारामध्ये १८ देशांमधून थेट परकीय गुंतवणूक राज्यात येणार असणे, टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करण्याचे प्रयोजन असणे, मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमी तयार करण्याचे प्रस्तावित असून त्यामुळे मुंबईतील पाणी, हवा यांचे प्रश्न सोडविणे शक्य होणार असणे, रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा दावोसमध्ये करण्यात आली असल्याने यात रुपये १ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित असणे, राज्यातील एकूण गुंतवणूकीमधून ४० लाख रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट साध्य होणार असणे, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्राचे दुसरे ऑटोमोबाईल हब होणार असणे, ग्रीन हायड्रोजन क्षेत्रात राज्याने तब्बल ५ लाख कोटींचे करार केले असणे, कृत्रिम बुध्दीमत्तेच्या क्षेत्रात जागतिक महासत्ता असलेल्या एनव्हीडियाशी झालेली चर्चा महाराष्ट्राला डिजिटल कॅपिटल बनविण्याचे पाऊल असणे, गडचिरोली ते नागपूर पर्यंतचा पट्टा पोलाद आणि अक्षय ऊर्जेचे हब बनणार असणे, कोकणात पर्यटनासोबतच 'लॉजिस्टिक हब' म्हणून कोकणची नवीन ओळख होणार असणे, राज्यात होणाऱ्या हवामान बदलास कोळसा, पेट्रोल, डिझेल अशा जीवाश्म इंधनापासूनची ऊर्जा निर्मिती कारण असणे, सर्व जिल्हयांसाठी आणि शहरांसाठी वातावरणीय कृती आराखडे तयार करण्यात येत असणे, त्याकरिता वातावरणीय कृती कक्ष स्थापन करण्यात आले असणे, राज्य प्रदूषणमुक्त करण्याकरिता विद्युत वाहन धोरण जाहिर करुन विद्युत वाहनधारकांना टोलमुक्त करुन विद्युत गाड्यांच्या वापरासाठी प्रवृत्त करण्यात आले असणे, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स गठीत करण्यात आला असणे, 'माझी वसुंधरा अभियान' राबविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय विभागाकडून देवराई फाऊंडेशन, पुणे या संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात येणे, या कराराद्वारे प्रत्येक तालुक्यामध्ये किमान १ मानवनिर्मित देवराई व घनवन तयार करण्यात येणे, औद्योगिक क्षेत्रात परकिय गुंतवणूक व कृत्रिम बुध्दीमतेच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्याचा होत असलेला प्रयत्न आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्मिती करण्याकडे होत असलेली वाटचाल अधिक गतीमान करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नऊ : **(गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री जयंत पाटील, आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री भास्कर जाधव, नाना पटोले, रोहित पवार, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री संदिप क्षीरसागर, दिलीप सोपल, अमिन पटेल, बापूसाहेब पठारे, अजय चौधरी, संजय मेश्राम, रोहित पाटील, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, उत्तमराव जानकर, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नारायण पाटील, सुनिल राऊत, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री अभिजीत पाटील, संजय पोतनीस, अमित झनक, राजू खरे, नितीन देशमुख, विकास ठाकरे, वरुण सरदेसाई, शिरीषकुमार नाईक, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, साजिद खान पठाण, हारुन खान, हेमंत ओगले, महेश सावंत, रामदास मसराम, प्रविण स्वामी, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी M/S VSR Ventures Pvt. Ltd. संचालित खाजगी विमानाच्या अपघातात राज्याचे तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा झालेला दुर्देवी मृत्यू, या संपूर्ण अपघाताची सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, पिंपरी चिंचवड येथे बलात्कार, खून, चोरी, दरोडा इत्यादी १२३ गुन्ह्यांची नोंद झालेली असणे, राज्यात लहान बालकांच्या अपहरणात भयंकर वाढ झालेली असून त्यामुळे पालकांत पसरलेले भितीचे वातावरण, लहान बालिकांवर करण्यात येत असलेले बलात्कार, बदलापूर येथे पुन्हा चार वर्षीय बालिकेवर बलात्कार केल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, “स्पा” च्या नावाखाली राज्यात ठिकठिकाणी सुरु असलेला देह विक्रिचा व्यवसाय, राज्यात ऑनलाईन जुगार मोठ्या प्रमाणात सुरु असून शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात सुद्धा या जुगाराचे लोण पसरलेले असणे, ड्रग्स व अंमली पदार्थांच्या विक्रीवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील गारगाव येथील एका वीस वर्षीय तरुणीची तीन लाख रुपयांना विक्री केल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, राज्यातील महिलांवर वाढत्या अत्याचाराच्या घटनांमुळे महिलावर्गात पसरलेले भितीचे वातावरण, यांना आळा घालणाऱ्या व महिलांना कायदेशीर संरक्षण देणाऱ्या शक्ती कायद्याची अद्यापही अंमलबजावणी करण्यात न येणे, एकंदरीतच राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, पोलिस प्रशासनावरील शासनाचे सुटलेले नियंत्रण, महावितरण कंपनीच्या राज्यातील जालना, छत्रपती संभाजी नगर, नांदेड, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, सोलापूर, धाराशिव इत्यादी जिल्ह्यातील मंडळ कार्यालये खाजगी कंपन्यांना देण्याचा निर्णय दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजी घेण्यात येणे, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिकल वर्कर्स फेडरेशनने सदर निर्णयास केलेला तीव्र विरोध, नागपूर, जळगाव व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खाजगी विद्युत कंपन्यांनी कराराच्या मुदतीआधीच कामे सोडून देणे, ओरिसा व उत्तर प्रदेशमध्येही खाजगी विद्युत कंपन्यांनी वीज वितरणामधून माघार घेणे, असे असतांनाही

राज्यात विद्युत कंपनीच्या खाजगीकरणाचा आग्रह असणे, पश्चिम महाराष्ट्रात ३११ कोटी रुपयांची विद्युतमंडळाची थकबाकी असणे, “मागेल त्याला कृषी सौरपंप” योजनेच्या लाभासाठी निवड झाल्यानंतर पैसे भरुनही सौरपंप मिळत नसल्याने राज्यातील सुमारे अडीच लाख शेतकरी त्रस्त असणे, मुंबई शहराच्या पूर्व व पश्चिम उपनगरांमध्ये ६० ते ७० वर्षापूर्वीच्या अनेक जुन्या व जीर्ण झालेल्या अनेक चाळी/इमारती असणे, मुंबई शहराप्रमाणे उपनगरांसाठी इमारत व घर दुरुस्ती मंडळ नसणे, त्या इमारती केव्हाही कोसळण्याच्या स्थितीत असणे, या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे जीवन धोक्यात आलेले असणे, एसआरए योजनांमध्ये अशा जुन्या चाळीतील वरच्या मजल्यावरील रहिवाश्यांना सामावून घेण्यात येत नसणे, ज्यामुळे पुनर्विकासामध्ये येणाऱ्या प्रचंड अडचणी, राज्यातील विविध शासकीय विभागांमध्ये वाढत चाललेल्या भ्रष्टाचाराच्या घटनांमुळे प्रशासनावरील जनतेचा विश्वास ढासळत असणे, महसूल, बांधकाम, आरोग्य, शिक्षण, नगरविकास, सामाजिक न्याय, जलसंधारण तसेच इतर अनेक विभागांमध्ये कामे मंजूर करण्यासाठी, परवाने देण्यासाठी, कंत्राटे देण्यासाठी तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत असणे, अनेक प्रकरणांमध्ये भ्रष्टाचार उघडकीस येऊनही दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होत नसल्याने अशा प्रकारांना प्रोत्साहन मिळत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होणे, शासनाच्या औषध खरेदीत होत असलेली अनियमितता आणि भ्रष्टाचार, तसेच महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात होत असलेला भ्रष्टाचार, परिणामी सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कामांसाठी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून शासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असणे, राज्यातील विविध विभागांमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचाराच्या घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच प्रशासनात पारदर्शकता व जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता, याबाबत राज्यशासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**दहा : अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुरःस्थापनार्थ :-**

(१) **श्री. शंकर जगताप, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र नगर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (सुधारणा) विधेयक, २०२६

(२) **श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र समान नागरी संहिता विधेयक, २०२६

(३) **श्री. शंकर जगताप, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र फसवणूकपूर्वक धर्मांतरण, दबाव व लव्ह जिहाद प्रतिबंध विधेयक, २०२६

(४) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र योग आयोग विधेयक, २०२६

(५) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ — भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

(६) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ — मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

**(ब) विचारार्थ :-**

**(शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले तथापि चर्चा न झालेले अशासकीय विधेयके) (१ व २)**

(१) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५

(२) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२५

**(मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ रोजी बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेली अशासकीय विधेयके क्रमांक ३ ते ६)**

(३) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८८ - किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५

(४) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिराती फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२५

(५) **श्री. अबू आजमी, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८३ - महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, धर्मगुरु व धर्मग्रंथ, धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध विधेयक, २०२५

(६) **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

(७) **श्री. अमीत साटम, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र भविष्य कल्याण विधेयक, २०२६

**अकरा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)**

**(१) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४१**

"राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रिडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २९**

"पुणे शहरातील मुळा-मुठा नद्या आणि इतर जलस्रोत गंभीर प्रदूषित असणे, अपुरी सांडपाणी प्रक्रिया क्षमता, अनधिकृत बांधकामांमुळे नद्यांमध्ये सांडपाणी मिसळणे, पाणीपुरवठयाचे असमान वितरण (काही भागात ६०० लिटर तर काहीत १०० लिटर प्रति व्यक्ती), खडकवासला आणि इतर धरणांमधील प्रदूषण वाढणे, यामुळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता धोक्यात येणे आणि आरोग्य समस्या निर्माण होणे, नद्यांचे पुनरुज्जीवन आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना (जसे JICA) गती देणे आवश्यक असणे, तरी शासनाने पुणे शहर आणि जिल्ह्यातील नदी प्रदूषण रोखण्यासाठी आणि पाणीपुरवठा समान व न्यायपूर्ण करण्यासाठी तातडीने कालबद्ध योजना राबवावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) श्री. अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ८९**

"राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना स्थानिक भूमीपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १२ मार्च, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.